# परिपत्रक

सन 2025-26 च्या सनदी लेखा परीक्षणामध्ये Bank Reconciliation अनुषंगाने विद्यापीठाच्या काही खात्यामध्ये रक्कमा Direct जमा होत असतात. सदर रकमा Unidentify असलेने कॅशबुक मध्ये नोंद होत नाही याबाबत आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

याबाबत विद्यापीठामध्ये विविध महाविद्यालये/संस्था, ठेकेदार, पुरवठादार, व्यक्ती यांचेकडून जमा होणाऱ्या रकमेसाठी सन 2023 पासून online portal द्वारे रकमा जमा करण्यात येत आहेत. तथापि विद्यापीठाच्या युको बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया इत्यादी बँकांमध्ये विविध व्यक्ती, संस्था, अनुदानित संस्था यांचेकडून प्रकल्प अनुदानाच्या, consultancy, परीक्षाविषयक गुणतक्ता/transcript इ. विविध कारणासाठी रकमा offline स्वरुपात जमा होत असतात. सदर रकमेबाबत संबंधित विभाग/अधिविभाग यांचेकडून जमा पावती होत नाही तोपर्यंत सदर रकमा बँकेमध्ये जमा राहतात. सदर रकमा या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्याच्या जमा पावत्या होत नाहीत तोपर्यंत सदर रकमांची कॅशबुकमध्ये नोंद होत नाही, तोपर्यंत सदर रकमेची गुंतवणूक करता येत नाही त्यामुळे व्याजाचे नुकसान होते. सदर रकमेचा विद्यापीठास Cash flow maintain करणेसाठी वापर करता येत नाही. तसेच सदर रकमेच्या पावत्या न केलेने प्रत्यक्ष रकमा जमा असताना येणे रकमा दिसून येतात. त्यामुळे सदर रकमेचा निव्वळ बँकेस फायदा होतो.

उपरोक्त बाबी विचारात घेता सदर आक्षेपाच्या अनुषंगाने लेखा परीक्षण उपसमितीच्या बैठकीमध्ये विद्यापीठाच्या विविध बँक खात्यामध्ये offline रकमा जमा होत असतात त्याच्या पावत्या संबंधित विभाग/अधिविभागांनी तात्काळ करणेबाबत सूचित करण्यात आले आहे.

सबब, विद्यापीठातील विविध अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक, प्रकल्प अन्वेषक, प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या युको बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया इत्यादी बँकामध्ये विविध व्यक्ती, संस्था, अनुदानित संस्था यांचेकडून प्रकल्प अनुदानाच्या, scholarship रकमा, consultancy, परीक्षाविषयक गुणतक्ता/transcript इ. कारणासाठी रकमा offline स्वरुपात जमा होत असतात. सदर रकमा ज्या तारखेला जमा होतात त्या तारखेपासून 07 दिवसाच्या आत पावती करणेत यावी. अन्यथा याची जबाबदारी संबंधित विभाग/अधिविभागाची राहील.

वित्त व लेखा अधिकारी

जा.क्र./शिवाजीवि/कॅशबुक/326

दि. 09 OCT 2026